# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 18/01/2022 (मंगळवार)

(सकाळ)

---

### चोरी

1) पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत 12 कि. मी. अंतरावरील मौजा आमडी फाटा येथे दिनांक 17/01/2022 चे 01.15 वा. ते 02.10 वा. दरम्यान फिर्यादी हे स्टाफसह विभागीय गस्त करीत असतांना आमडी फाटाजवळ सी.जी.—04/जे.डी.—5117 क्रमांकाचा ट्रकमध्ये चोरीचा दगडी कोळसा भरतांना मिळुन आल्याने काही लेबर पळुन गेले. ट्रक चालक आरोपी क्र. 1. सुधीर श्रावणलाल पटले वय 40 वर्ष रा. खवासा ता.पारशिवनी म.प्र. याला विचारपुस केली असता सदरचा कोळसा मालक फरार आरोपी क्र. 3. कोळसा मालक शैलेश कळबे रा. कन्हान गणेश नगर याचे असल्याचे सांगुन आरोपी क्र. 3 यास सदर दगडी कोळश्याबाबत विचारपुस केली असता सदरचा कोळसा चोरीचा असल्याचे सांगुन धर्मकाटयावर असल्याचे सांगितले व अंधाराचा फायदा घेत पळुन गेले. सदरचा चोरीचा 25 टन दगडी कोळसा कि. अंदाजे 1,50,000/— रू. व अशोक लेलॅड 12 चक्का ट्रक सी.जी.—04/जे.डी.—5117 कि. 11,50,000/—रू. असा एकुण 13,00000/—रू. चा मुद्देमाल यातील 1) ट्रक क्र. सी.जी—04/जे.डी—5117 चा चालक सुधीर श्रावणलाल पटले वय 40 वर्ष रा. खवासा ता.पारशिवनी म.प्र., 2) विशाल सुरमन उचेबगले वय 20 वर्ष रा. तुमसर जि.भंडारा, 3) फरार कोळसा मालक शैलेश कळबे रा. कन्हान गणेश नगर, 4) फरार ट्रक मालक हे संगणमताने ट्रकमध्ये भरतांनी मिळुन आले.

सदर प्रकरणी सरतर्फे मसपोनि स्वाती यावले पो.स्टे. रामटेक यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1 व 2 ला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार संदीप कडू मो.क्र. 9823722418 हे करीत आहे.

2) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :— अंतर्गत 03 कि. मी. अंतरावरील विक्तुबाबा देवस्थान टाकळघाट येथे दिनांक 17/01/2022 चे 13.00 वा. ते 13.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ.अस्मिता आकाश मेश्राम वय 28 वर्ष, रा. इंदिरा सोसायटी साई मंदिर समोर भिलगाव, नागपूर हि विक्तुबाबा देवस्थान टाकळघाट येथे भोजनकक्ष मध्ये मुलांना जेवन करण्याकरीता घेवुन गेली असता अज्ञात आरोपीने फिर्यादीने गळयात घातलेली सोन्याची पोत किं 25,000/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मेटकर मो.क्र. 9623782508 हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. उमरेड :– जानेवारी 2021 ते 16/01/22 चे 13/00 वा पर्यंत चे सुमारास वय 23 वर्ष फिर्यादी/पीडिता ही डेव्हलपर्स नागपूर यांचे माध्यमातुन प्लाट खरेदी विक्रीचे काम करते. तिचे आईवडील व भाउबहिण नाही. सन 2020 डिसेंबर मध्ये प्लॅट खरेदी विक्रीकरीता उमरेड येथे आली त्यादरम्यान तीची ओळख आरोपी नामे– रूपेश राजपूत, रा. राजूरवाडी याचेशी झाली. त्यावेळी त्यांनी मोबाईल क्रमांक शेअर केले. दोघांचेही बोलणे व अधूनमधून कधी नागपूर कधी उमरेडला भेटने सुरू झाले. अंदाजे 10/01/21 रोजी 'मी तुझेवर प्रेम करतो लग्नपण करणार' असे आरोपीने तिला म्हटले होते. त्याने लग्नाला प्रपोज केल्याने फिर्यादीही तयार झाली. त्यानंतर आरोपीने माहे जानेवारी 2021 मध्ये उमरेड येथे किरायाने रूम घेतली. रूमचे किराया व घरघुती किराणा सामानही आरोपी आणुन देत होता. यानंतर आरोपीने रूमवर येवून तिला विश्वासात घेवुन 'आपण लग्न करू' असे म्हणून फिर्यादीसोबत उमरेड येथिल रूमवर येवून वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापीत केले. फिर्यादीने आधी लग्न कर असे म्हटले लग्न करण्याबाबत फुस लावुन आज करू, उदया करू असे म्हणुन वारंवार शारीरिक संबंध केले. तो लग्न करेल या आशेने तिने कोणालाही काहीही सांगितले नाही. दि 25/05/2021 रोजी समजले की, ती गर्भवती आहे. त्यामुळे तीने त्यास लग्नाबाबत विचारले असता 'तु गर्भपात कर माझे लग्न झाले आहे, तुझ्यासोबत लग्न करू शकत नाही' त्याच्यामुळे फिर्यादी 8 महिण्याची गर्भवती राहीली आहे, असे तिने रूपेश ला सांगुन सुदधा त्याने दि. 16/01/2022 रोजी 'तु गर्भपात करून घे, आता मी तुझ्यासोबत लग्न करणार नाही'' असे म्हटल्याने फिर्यादी ही दि. 17/01/2022 रोजी तीचे मैत्रीणी सोबत येवून पो.स्टे. उमरेड ला रिपोर्ट दिल्याने सदरचा गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 376, 417 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी खोब्रागडे मो. क्र. 8308082094 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील मारोडी पुलीया जवळ येथे दिनांक 17/01/2022 चे 01:00 वा. दरम्यान एन.एल.– 01/एडी–3507 क्रमांकाच्या कंटेनरचा चालक आरोपी/मृतक नामे– सुनील हरीदास कांबळे वय 32 वर्ष, रा. चांदुर रेल्वे अमरावती याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून त्याचा गाडी वरुन संतूलन गेल्याने समोरील जाणा–या एन.एल.–01/एडी– 1287 क्रमांकाच्या कंटेनर ला बाजूने धडक मारुन क्लीनर नामे– पुरुषोत्तम फरकंडे यास जखमी होण्यास व स्वताचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे सपोनि सोनेकर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 327, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सोनेकर मोक्र 8975921770 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत मौजा आष्टी येथे दिनांक 12/01/22 चे 23.40 वा. दरम्यान भुनेश्वर भिमराव धोटे (मृतक), वय 29 वर्ष रा.आष्टी ता. मौदा याने अज्ञात कारणातुन त्याचे राहते घरी विषारी औषधी प्राषन केले. त्याची प्रकृत्ती खराब झाल्याने त्यास उपचारा कामी भंडरा येथे नेले असता उपचार सुरु असतांना दि. 12/01/22 चे 23. 40 वा. मरण पावला. पोस्टे ला प्राप्त कागदपत्रा वरुन सदर मर्ग दाखल करुन तपासात घेतला.

सदर प्रकरणी सहायक फौजदार नंदेश्वर पो. स्टे भंडारा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार देशमुख मो.क्र. 9922447045 हे करीत आहे.

2) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत भारकस येथे दि. 13/01/2022 रोजी दुपारी 13.30 वा. सुमारास कु. अंजली रामसदोदर रावत(मृतक), वय 04 वर्ष रा.खोडवानी पो.स्टे हनुमना जि.रिवा, ह.मु भारकस ही आपले घराबाजुला खेळत असतांना गावातील लावारीस कुत्र्याने तिला डावे भागास कंबरेला चावा घेतला. तिला उपचारकरीता प्रथम सरकारी दवाखाना टाकळघाट येथे नेले व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे उपचार करून घरी नेले घरी 3 दिवस ठेवुन परत नागपुर मेडीकल कॉलेज येथे भरती केले असता दि. 17/01/2022 रोजी 01.15 वा डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार माकडे मेडीकल पोलिस बुथ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार करपाते हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर